**!! <u>प्रेसनोट</u> !!** **दि.२४/१२/२०२४**

## <u>कांदीवली येथील खाजगी कंपनीचे मालक यांचे सायबर गुन्हयात फसवणूक झालेले ४.६५ करोड रूपये ४ तासात वाचविण्यात १९३० सायबर हेल्पलाईन, गुन्हे शाखा, मुंबईचे पथकास यश.</u>

मुंबई शहरातील नगरीकांची सायबर गुन्हयामध्ये फसवणुक झालेली रक्कम सबंधित बॅक खात्यामध्ये गोठविण्याकरीता मुंबई पोलीस गुन्हे शाखे अंतर्गत १९३० हेल्पलाईन कार्यान्वित करण्यात आली आहे. याद्वारे सायबर गुन्हयात आर्थिक फसवणुक झालेले तक्रारदार यांनी १९३० हेल्पलाईनवर संपर्क करून तक्रार नोंदविली असता, त्यांची फसवणुक झालेली रक्कम सबंधित बॅक खात्यांवर गोठविण्यात येते.

दि.२३/१२/२०२४ कांदीवली, मुंबई येथे खाजगी कंपनीचे मालक यांचे **Sim Swipe** करून त्याचा बेकायदेशिर मार्गाने वापर करून तसेच तक्रारदार यांचे कंपनीच्या नावे असलेल्या बॅक खात्यामध्ये अनाधिकृतरित्या प्रवेश मिळवून त्यामधून मोठया प्रमाणावर ट्रान्झेक्शंन करून एकुण ७.५० करोड रूपये विविध बॅक खात्यांवर वळविण्यात आले. सदर बाबत ई-मेल द्वारे माहिती प्राप्त झाल्यावर तक्रारदार यांनी करण्यात आले १९३० सायबर हेल्पलाईनवर संपर्क करून तक्रार नोंदविली.

१९३० सायबर हेल्पलाईन कक्षाचे पोउनि मंगेश भोर, पोहवाक्र. ०१०६४४/राउळ, मपोहवाक्र.०५०१६४/वालवलकर, पोशिक्र.०८०५९१/किरण पाटील यांनी तात्काळ NCCRP PORTAL वर तक्रार दाखल करून संबधित बॅकेच्या नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधून केलेल्या कार्यवाहीमुळे तक्रारदार यांची सायबर गुन्हयात फसवणूक रकमेपैकी **<u>रूपये ४,६५,६०,०४१/- (अक्षरी चार करोड पासष्ट लाख साठ हजार ऐक्केचाळीस रू.)</u>** संबधित बॅक खात्यांवर ४ तासाच्या आत होल्ड करण्यात १९३० हेल्पलाईन पथक, गुन्हे शाखा, मुंबई यांना यश आले आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. लखमी गौतम, पोलीस सह आयुक्त, गुन्हे, मा. श्री. शशीकुमार मिना, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री. दत्ता नलावडे, पोलीस उप आयुक्त, सायबर गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. दत्ताराम चव्हाण, व.पो.नि. पश्चिम प्रा. सायबर पो. ठाणे पोउनि मंगेश भोर, यांच्या १९३० हेल्पलाईन पथक, यांनी पार पाडली आहे.

नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी सायबर गुन्हयामध्ये आर्थिक फसवणुक झाल्यास तात्काळ १९३० हेल्पलाईनवर संपर्क करावा जेणेकरून आपली फसवणूक झालेली संपुर्ण किंवा जास्तीत जास्त रक्कम वाचवली जाईल.

**Sim Swipe करून आर्थिक फवसवणूकीची कार्यपद्धती :-**

१) सोशल मिडीयाचे माध्यमातून विविध व्यवसायीक, प्रतिष्ठीत व्यक्ति इत्यादी सोबत मैत्री करून त्यांचे सोशल इंजीनिअरींग करून वैयक्तीक व कामकाजाविषयी माहीती प्राप्त केली जाते. तसेच व्हायरस, APK FILE किंवा मालवेअरचा उपयोग करूनही माहिती गोळा केली जाते.

२) काही फिशिंग लिंक्स पाठवून त्यावर क्लिक करण्यास सांगून खासगी तसेच आर्थिक माहिती गोळा केली जाते. काहीवेळेस फसवणूक करणा-या एजन्सीज बँकांचा डेटाबेसही विकत घेतात.

३) एकदा अशी माहिती मिळाली की बनावट ओळखपत्र तयार करून सिम ब्लॉक करण्याची किंवा नविन ई-सिम कार्यान्वीत करण्याची विनंती मोबाइल कंपन्यांना केली जाते.

४) मोबाइल कंपन्यांनी नवे सिम दिल्यावर त्यावर ओटीपी मिळवून आर्थिक व्यवहार केले जातात. नवे सिमकार्ड त्यांच्याकडे असल्यामुळे ओटीपी त्या फसवणूक करणा-या इसमांकडे जातो आणि ते पुढील व्यवहार करतात. अशा प्रकारे खात्यातील पैसे अनेक खात्यांवर वळवले जातात.

**नागरीकांना आवाहन/प्रतिबंधात्मक उपाय :-**

१) Sim Swipe होवून आर्थिक फवणूक टाळणेकरीता, प्रत्येक बँक अकाऊंटला SMS शिवाय इ-मेल अलर्ट देखील कार्यान्वीत करावे.

२) अचानक वैयक्तीक किंवा कंपनीचे बॅक खात्याशी संलग्न असलेले सिम कार्ड बंद झाल्यास सबंधित बँकेला त्याचा अकाऊंटशी असलेला संबंध तोडण्यास कळवावे.

३) सिम स्वॅपिंगचे प्रकार साधारणपणे सार्वजनिक सुटटीच्या दिवशी (सर्वसाधरणपणे शनिवार, रविवार या दिवशी) सलग सुट्यांच्यावेळी घडतात तसेच मोबाइल गॅलरी व बँकांशी प्रत्यक्ष जावून संपर्क करण्यात अडथळा येतो अशावेळी कस्टमर केअर यांच्याशी संपर्क साधून वेगाने पावले उचलण्याची गरज आहे.

४) टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन (2FA) सक्षम करा: सोशल मिडीया चे वापरामध्ये जाऊन 2FA (Two-Factor Authentication) कार्यान्वीत करा. हे आपल्या सोशल मिडीया खात्यांमध्ये अनोळखी व्यक्तींना अनधिकृत प्रवेश रोखण्यास मदत करू शकते.

५) आपल्या इंटरनेट/मोबाईल बॅकींगचे पासर्वड ठरावीक कालावधीनंतर आवर्जून बदलावे.

**# cybersafemumbai**

**Report Cyber Crime On Helpline 1930**

**https://cybercrime.gov.in**